# जिल्हा परिषद, यवतमाळ

| | | |
|---|---|---|
| विभागाचे नाव | :- | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ |
| विषय समिती सभापती | :- | मा. अध्यक्ष, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती. |
| खाते प्रमुखाचे पदनाम | :- | कार्यकारी अभियंता |
| विभागाचा दुरध्वनी क्रमांक | :- | ०७२३२-२४६९०० |
| ईमेल | :- | eebnytl@gmail.com |
| वेबसाईट | :- | **www.ddws.gov.in** |

# विभागासंदर्भात माहीती

जिल्हा परीषद, यवतमाळ अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे ६ उपविभाग व १ यांत्रीकी उपविभाग असे एकुण ७ उपविभाग आहेत. या विभागामार्फत नविन ग्रामीण पाणी पुरवठा योजना व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्तीची कामे केली जातात.

कार्यकारी अभियंता हे या विभागाचे खाते प्रमुख असुन या विभागामध्ये तीन शाखा आहेत.

**१. तांत्रीक शाखा, २. आस्थापना पत्र व्यवहार शाखा व ३.लेखा शाखा**

तांत्रीक शाखेत पाणी पुरवठा योजनांच्या प्राकलनास मंजुरात देण्याचे कामकाज होते, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची कामे उपविभागातील शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे कडुन पाहीली जातात.

आस्थापाना शाखेमध्ये कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी, रजा प्रकरणे, वार्षीक वेतनवाढ, वेतन देयके, प्रवास भत्ता देयके, वेतन निश्चीती, सेवा निवृत्ती प्रकरणे, बदल्या, नियुक्त्या इत्यादी कामे केली जातात.

लेखा शाखेमध्ये कंत्रांटदारांची कामाची देयके पारीत करणे, नोंदवहया, हिशेब ठेवणे तसेच भांडार शाखेत वस्तु खरेदी करणे, हिशेब ठेवणे इत्यादी कामे पाहीली जातात.

## <u>विभागाची संरचना</u>

| | | |
|---|---|---|
| यवतमाळ उपविभाग | :- | यवतमाळ, आर्णी व बाभुळगांव तालुके |
| राळेगांव उपविभाग | :- | कळंब व राळेगांव तालुके |
| पांढरकवडा उपविभाग | :- | पांढरकवडा व घांटंजी तालुके |
| वणी उपविभाग | :- | वणी, मारेगांव व झरीजामणी तालुके. |
| दारव्हा उपविभाग | :- | दारव्हा व नेर तालुके |
| पुसद उपविभाग | :- | पुसद, दिग्रस, महागांव व उमरखेड तालुके. |

**विभागाअंतर्गत खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांची रचना केलेली आहे.**

# कार्यालयाच्या रचनेचा तपशिल



**विभागाअंतर्गत खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी पदे आहेत.**

| अ.क्र | पदनाम | वर्ग |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | वर्ग - १ |
| २ | उपकार्यकारी अभियंता | वर्ग - १ |
| ३ | सहाय्यक प्रशासन अधिकारी | वर्ग - ३ |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी | वर्ग - ३ |
| ५ | शाखा अभियंता | वर्ग - २ |
| ६ | शाखा अभियंता | वर्ग - २ |
| ७ | कनिष्ठ अभियंता | वर्ग - ३ |
| ८ | कनिष्ठ अभियंता | वर्ग - ३ |
| ९ | आरेखक | वर्ग - ३ |
| १० | वरिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| १३ | वरिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| १४ | वरिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| १५ | वरिष्ठ सहा (लेखा) | वर्ग - ३ |
| १६ | कनिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| १७ | कनिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| १८ | कनिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| १९ | कनिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| २० | कनिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| २१ | कनिष्ठ सहाय्यक | वर्ग - ३ |
| २२ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | वर्ग - ३ |
| २३ | परिचर | वर्ग - ४ |
| २४ | परिचर | वर्ग - ४ |
| २५ | परिचर | वर्ग - ४ |
| २६ | परिचर | वर्ग - ४ |
| २७ | परिचर | वर्ग - ४ |
| २८ | परिचर | वर्ग - ४ |

# ग्रामीण पाणी पुरवठा योजना

| अ. क्र. | शिर्षक | सन २०१६-१७ मधील उद्दीष्ट | सन २०१६-१७ मध्ये पूर्ण उद्दीष्ट | सन २०१७-१८ मध्ये प्रगतिपथा वरील योजना | सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित योजना |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम | ४६ | २९ | १७ | २२ |
| २ | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम | १० | - | - | १० |

# राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

सद्यस्थितीत विभागामार्फत केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७ दिनांक १७.०३.२०१० नुसार राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रम मागणी आधारीत आहे.

दिनांक २७ जुलै २००० पासुन राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम लोक सहभागाचे तत्वावर राबविण्यात येत आहे. यामध्ये एका गावाची योजना असल्यास निधी थेट ग्राम पंचायतींना उपलब्ध करुन दिल्या जातो व योजना एकापेक्षा अधिक गावाची असल्यास जिल्हा परिषदेने अथवा योजनेत समाविष्ठ असलेल्या सर्व ग्राम पंचायतीचे संयुक्त ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हा परिषदेचे मान्यतेने करण्यास मुभा आहे.

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४९ अन्वये ग्राम सभेच्या सहमतीने ग्राम पंचायतच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावयाची आहे तर याच कलमान्वये गठीत ग्राम पंचायतीच्या ग्राम सामाजीक लेखा परिक्षण समितीने योजना योग्य प्रकारे राबविली जाण्याचे दृष्टीने सनियंत्रण करावयाचे आहे.

योजनेची मागणी करतांना व योजना कालावधीत योजने संबंधी होणारे सर्व निर्णय ग्राम सभेतून होणे गरजेचे आहे. तसेच गांव १००% हागणदारी मुक्त असणे अनिवार्य आहे.

**(अ) ग्राम पंचायत स्तरावर प्रस्ताव सादर करतांना करावयाची आवश्यक पूर्तता**

१. या योजनांमध्ये गावाची निवड होण्यासाठी संबंधीत गावच्या ग्राम सभेच्या सहमतीने रितसर अर्ज जिल्हा परिषदेकडे करणे आवश्यक आहे.

२. मागणी करण्यापूर्वी प्रत्येक वार्ड, वाडया वस्त्या निहाय स्वतंत्र ग्रामसभा घ्यावी व या ग्रामसभां मधील आशय महिलांची स्वतंत्र ग्रामसभा घेवून चर्चीला जावा व त्यानंतर सर्व साधारण ग्रामसभेतून चर्चा होवून अंतीमत: मागणी जि. प. कडे सादर करावी.

३. गावामध्ये पाणी पुरवठा सुविधेची मागणी करतांना पुढील १५ ते २० वर्षाचा विचार करावा व गावातील सर्व जुन्या उदभवापासुन मिळणारे पाणी तथा जुन्याच उदभवांना पुर्नजिवीत करुन भविष्यातील गरज भागवीली जाऊ शकते काय याचा सुध्दा विचार करुन शक्य असल्यास तिच उपांगे वापरण्यावर भर द्यावा व जेथे पर्यायच नसेल अशाच ठिकाणी नविन उदभवाची निर्मिती करावी.

४. नवनिर्मित उदभव काही कालावधीनंतर कुचकामी ठरु नये याकरिता उदभव बळकटीकरणाकरिता आवश्यक पारंपारीक व अपारंपारीक उपाय योजना घ्याव्यात.

५. गावाने जिल्हा परिषदेकडे अर्ज सादर करतांना योजनेसाठी दिलेला पर्याय हा किमान खर्चाचा असावा.

६. ग्रामसभेने जेवढे अधिकार दिले असतील तेवढेच अधिकार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने व सामाजीक लेखा परिक्षण समितीने वापरले पाहजेत.

७. गावाने पाणी लेखा परिक्षण व पाणी अंदाजपत्रक सहभागी पध्दतीने करुन घेणे अनिवार्य आहे.

८. गावाने योजनेसाठी जिल्हा परिषदेकडे अर्ज सादर करतांना ग्रामसभा घेवून त्या ग्रामसभेत घेतलेल्या पुढील निर्णयांची ठरावाची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

(ब) सिंचनासाठी गावठाणात विंधन विहिर घेण्यात येणार नाही.

(क) ग्रामपंचायतीने योग्य (राज्य शासनाने ठरवून दिलेल्या किमान दरापेक्षा कमी असेल ऐवढी ) पाणीपट्टी लावून त्याची वसुली करुन योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या १००% खर्च वसुल केल्या जाईल व योजनेचा शेवटचा हप्ता मिळण्यापूर्वी ३ महिन्यांची पाणीपट्टी लाभधारकांकडून आगावू वसुल केली जाईल. या नुसार प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषद कडुन आर्थिक मंजुरीची कार्यवाही करण्यात येते. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल या नावाने अंमलात असलेल्या योजनेत शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७ दिनांक १७.०३.२०१० नुसार काही धारेणात्मक बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार समितीचे सचिव हा ग्राम पंचायतीचा सचिव असेल व समितीचे अध्यक्ष हा ग्राम पंचायतचा सरपंच राहील.

## ईतर योजना

या व्यतिरीक्त या विभागामार्फत आदिवासी उपयोजना व ठक्कर बाप्पा या योजनेत आदिवासी विकास प्रकल्प कार्यालया कडुन सुचविलेली पाणी पुरवठा विषयक कामें तसेच स्थानिक विकास निधी अंतर्गत मा. खासदार व मा. आमदार यांनी सुचविलेली व निधी उपलब्ध करुन दिलेली पाणी पुरवठा विषयक कामें केली जातात.

**माहीतीचा अधिकार २००५ अन्वये विभागाअंतर्गत माहीती अधिकारी / सहाय्यक माहीती अधिकारी / अपिलीय अधिकारी यांची माहीती जिल्हा परीषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यवतमाळ**

| जन माहीती अधिकारी | सहाय्यक माहीती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| सहाय्यक प्रशासन अधिकारी | आस्थपना व अंकेक्षक | उप कार्यकारी अभियंता |

## जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अंतर्गत कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यासनाबाबत माहीती.

| पदनाम | सोपविलेली कामे |
|---|---|
| कार्यकारी अभियंता | विभाग प्रमुख |
| उप कार्यकारी अभियंता | का. अ. यांचे स्विय सहाय्यक |
| सहाय्यक प्रशासन अधिकारी | प्रशासन विभाग |
| सहाय्यक लेखा अधिकारी | लेखा विषयक कामे |
| शाखा अभियंता | तांत्रिक कामे |
| शाखा अभियंता | तांत्रिक कामे |
| शाखा अभियंता | तांत्रिक कामे |
| शाखा अभियंता | तांत्रिक कामे |
| आरेखक | तांत्रिक |
| वरिष्ठ सहाय्यक | आस्थापना १ व २ |
| वरिष्ठ सहाय्यक | रोखपाल |
| वरिष्ठ सहाय्यक | अंकेक्षक, |
| वरिष्ठ सहाय्यक | अंकेक्षक, |
| वरिष्ठ सहाय्यक | टंचाई, अंकेक्षक |
| वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | बजेट |
| कनिष्ठ सहाय्यक | भांडारपाल |
| कनिष्ठ सहाय्यक | निविदा व अंकेक्षक |
| कनिष्ठ सहाय्यक | आस्था १ सहाय्यक |
| कनिष्ठ सहाय्यक | आवक |
| कनिष्ठ सहाय्यक | जावक |
| कनिष्ठ सहाय्यक | सभा, लेखाआक्षेप |